# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्र.६ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ (निकाल विभाग)

कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : director.boee@unigug.ac.in

जा.क्र. गों.वि./परीक्षा वि/3992/२०२६

दिनांक: १९/०१/२०२६

## अधिसुचना

**विषय :– गोंडवाना विद्यापीठाच्या तेरावा दीक्षांत समारंभास उपस्थित राहणेबाबत.**

**संदर्भ :– विद्यापीठाचे संकेत स्थळावर प्रकाशीत केलेली सुवर्णपदक गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी.**
**१) जा. क्र. गो.वि./प.वि./१६६४/२०२५ दि. २५/११/२०२५**
**२) जा. क्र. गो.वि./प.वि./१६६५/२०२५ दि. २५/११/२०२५**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य तथा विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाचा तेरावा दीक्षांत समारंभ बुधवार, दि. २१/०१/२०२६ रोजी आयोजीत करण्यात आलेला आहे. सत्र २०२४–२५ च्या विविध अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीतील सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते दीक्षांत समारंभात कार्यक्रम स्थळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे. प्रथम गुणवत्ता प्राप्त (पदक प्रायोजित नसलेल्या) विद्यार्थ्यांच्या नावाची उद्घोषणा करण्यात येईल व दीक्षांत समारंभानंतर कार्यक्रम स्थळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.

करीता संदर्भीय अधिसुचनेनुसार सुवर्णपदक व गुणवत्ता यादीमधील प्रथम गुणवत्ता विद्यार्थ्यांनी बुधवार दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये उपस्थित राहावे. त्याबाबत सर्व संबधित प्राचार्यांनी सुवर्णपदक व प्रथम गुणवत्ता प्राप्त संबधित विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून कळवून सहकार्य करावे.

सूचना:– १. समारंभाला येताना ओळखपत्र व आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य आहे.
२. सभागृहामधील नियोजित जागी आपले स्थान ग्रहण करावे.
३. सभागृहामध्ये आपले भ्रमध्वनी संच बंद ठेवावे.
४. विद्यापीठातील वित्त विभागातून अनामत रक्कम रू. ५००/– भरून स्कार्फ प्राप्त करून घ्यावा.

19/01/2026

(डॉ. प्रवीण पोटदुखे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रतिलिपी:– १) मा. कुलगुरू यांचे स्वीय सहायक गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२) मा. प्र–कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर
४) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned by Camera Scanner